॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १३३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

*** सुविचार ***

तुमचा आजचा संघर्ष
उद्याच्या यशाचा पाया आहे.

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

वेळ

प्रयत्न आपल्या हाती
बाकी निसर्गाचा खेळ
आज आपली उद्या दुसऱ्याची
प्रत्येकाची येते वेळ

कुणालाच नाही ठाऊक
कुठून कसे येतात वार
तरीही स्टेट्स असतं
भलेभले गंमतमधी गार!

SPOT NEWS

भारत पाचवी एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली तैनात करणार

● **नवी दिल्ली** – भारत जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानला लागून असलेल्या ७४० किलोमीटर लांबीच्या नियंत्रण रेषेवर सुरक्षा मजबूत करण्याच्या तयारीत आहे. यासाठी पाचवी एस-४०० हवाई संरक्षण यंत्रणा तैनात करण्याची योजना आहे. भारतीय हवाई दलाचे एक पथक पुढील महिन्यात रशियाला जाऊन या यंत्रणेची प्री-डिस्पॅच तपासणी करणार आहे. फेब्रुवारी २०२७ पर्यंत ती तैनातीसाठी सज्ज होण्याची अपेक्षा आहे. ही माहिती या प्रकरणाशी संबंधित दोन अधिका-यांनी दिली आहे. अहवालानुसार, चीन २०२७ मध्ये पाकिस्तानला जे-३५ पाचव्या पिढीची लढाऊ विमाने देऊ शकतो. याला प्रत्युत्तर म्हणून भारत दीर्घ पल्ल्याची शस्त्रे आणि लोइटरिंग ॲम्युनिशन्स तयार करण्याची व खरेदी करण्याची योजना आखत आहे.

सोशल मीडिया कंटेंटवर सरकारी कारवाईचा वेग वाढला

● **नवी दिल्ली** – भारतात सोशल मीडिया आणि इंटरनेटवरील कंटेंटवर सरकारी यंत्रणा, पोलिस आणि न्यायालयांकडून होणाऱ्या कारवाईचा वेग मोठ्या प्रमाणात वाढल्याचे समोर आले आहे. जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत मेटाने भारतात ५४.३९ लाखांहून अधिक कंटेंट आणि अकाउंट्सवर निर्बंध घातले आहेत. याच काळात गुगललाही भारतात सरकारी यंत्रणा आणि न्यायालयांकडून हजारो कंटेंट हटवण्याच्या विनंत्या प्राप्त झाल्या. विशेष म्हणजे, मेटाच्या आकडेवारीनुसार भारतातील कंटेंटवरील निर्बंधांमध्ये मागील सहा महिन्यांच्या तुलनेत तब्बल १३,००० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी!

लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्के वाढीचा प्रस्ताव । पाठिंब्यासाठी भाजपचे शरद पवार गटाशी संपर्क

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) आणि महिला आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकातील बदलांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रस्तावानुसार विविध राज्यांमधील लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ करण्याचा विचार असून, राज्यांमधील जागावाटपाची सध्याची व्यवस्था २०५१ पर्यंत कायम ठेवण्याचा पर्याय पुढे आला आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या या विधेयकाला संसदेची मंजुरी मिळविण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांशी संपर्क साधल्याची माहिती आहे. विधेयकाबाबत असलेल्या शंका दूर करून पाठिंबा मिळविण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू असल्याचे समजते.

पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेली मंत्रिमंडळ बैठक सुमारे ४० मिनिटे चालली. या बैठकीत संसदेच्या आगामी कामकाजासह मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आणि महिला आरक्षणाशी संबंधित दुरुस्तीवर चर्चा झाली. सूत्रांच्या माहितीनुसार, या विधेयकांना मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

लोकसभेचे कामकाज ३० नोव्हेंबरपासून, तर राज्यसभेचे कामकाज २ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली तसेच महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधेयकाला आवश्यक पाठिंबा मिळविण्यासाठी भाजपचे वरिष्ठ नेते विविध पक्षांच्या संपर्कात आहेत.



महाराष्ट्रात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी भाजपकडून संवाद साधला जात आहे. यापूर्वीही या संदर्भात संपर्क करण्यात आला होता. विधेयक संसदेत मंजूर व्हावे, यासाठी भाजपकडून राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. विधेयकातील तरतुदींची माहिती घेतल्यानंतर त्याला पाठिंबा देण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याचे संकेत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडण्यासाठी संसदेचे चार दिवसीय विशेष कामकाज होण्याची शक्यता आहे. हे स्वतंत्र हिवाळी अधिवेशन नसून पावसाळी अधिवेशनाचाच पुढील भाग असल्याचे सांगण्यात येत आहे. ३० नोव्हेंबरपासून लोकसभेचे, तर २ डिसेंबरपासून राज्यसभेचे कामकाज सुरू होणार असून ३ डिसेंबरला अधिवेशनाचा समारोप होणार आहे. मात्र, सरकारकडून अद्याप अधिकृत कामकाजाचा अजेंडा जाहीर करण्यात आलेला नाही.

लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवून ८५० करण्याचा प्रस्ताव यापूर्वी चर्चेत होता. आता सर्व राज्यांमध्ये जागा ५० टक्क्यांनी वाढविण्याच्या नव्या सूत्रामुळे राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. राज्यांमधील विद्यमान जागावाटपाची व्यवस्था २०५१ पर्यंत कायम ठेवण्याच्या प्रस्तावामुळे लोकसंख्येतील बदलांचा जागावाटपावर होणारा परिणाम मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची पुनर्रचना केल्यास लोकसंख्या नियंत्रणात यश मिळविलेल्या दक्षिण भारतातील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व तुलनेने कमी होण्याची भीती व्यक्त केली जात होती. त्यामुळे दक्षिणेकडील राज्यांनी या प्रक्रियेबाबत चिंता व्यक्त केली होती. सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या जागा ५० टक्क्यांनी वाढविण्याचा पर्याय पुढे आल्याने या राज्यांच्या चिंतेवर तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या उद्देशाने सरकार महिला आरक्षण कायद्यातही दुरुस्ती करण्याच्या तयारीत आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये लोकसभेत संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६ मंजूर होऊ शकले नव्हते. त्यामुळे नव्या बदलांसह हे विधेयक पुन्हा मांडले जाण्याची शक्यता आहे.

डिलिमिटेशन विधेयकाच्या पाठिंब्यावरून राष्ट्रवादीत मतभेद; आव्हाडांची भूमिका अमोल कोल्हेंनी खोडली

● **मुंबई । वीरभूमी** –

डिलिमिटेशन विधेयकाचा मसूदा आल्याशिवाय पाठिंब्याचा निर्णय घेता येणार नाही. संसद समिती विधेयकाचा मसूदा समोर आल्याशिवाय त्यावर भूमिका घेणे योग्य ठरणार नाही. अद्याप हा मसूदा आला नाही. त्यामुळे पाठिंब्याचा निर्णय घेता येत नाही अशी भूमिका खा. अमोल कोल्हे यांनी मांडली आहे. डिलिमिटेशन विधेयकाला आमचा पाठिंबा असेल असे विधान राष्ट्रवादी नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली होती. त्यानंतर अमोल कोल्हे यांनी हे विधान केले.

खा. अमोल कोल्हे म्हणाले की, विधेयकाचा मसूदा अद्याप आमच्या हातात आला नाही. जोपर्यंत त्यातील बारकावे आम्ही समजून घेत नाही तोपर्यंत पाठिंब्याचा निर्णय घेता येणार नाही. डिलिमिटेशन ही संवैधानिक तरतूद आहे हे खरे आहे. परंतु जोपर्यंत विधेयक मसूदा समोर येत नाही तोपर्यंत पाठिंब्याचा निर्णय घेता येणार नाही. मसूदा आल्यानंतर पक्षातंर्गत बैठक होईल. त्यानंतर यावर चर्चा होईल. जर मसूदा संयुक्तिक असेल तर आम्ही सकारात्मक विचार करू असे सुप्रिया सुळे यांनीही म्हटले आहे. परंतु आधी मसूदा येऊ द्या, त्यावर चर्चा होईल. मग विरोध आणि समर्थनाचा निर्णय होईल असे त्यांनी सांगितले. तसेच कुठलीही भूमिका घेताना त्याची कारणेही पाहिली पाहिजे. विरोध करायचा असेल तर कोणत्या कारणासाठी आणि समर्थन द्यायचे असेल तर कोणत्या कारणासाठी, त्यामुळे आधी मसूदा येऊ द्या. विधेयकाच्या मसुद्यात काय आहे हे वाचल्याशिवाय त्यावर भाष्य करणे हे खूप घाईचे होत आहे. मसूदा समोर आल्यानंतर त्यावर निर्णय घेऊ. मंत्रिमंडळातील निर्णयाचे काही मुद्दे समोर आलेत पण विधेयकाचा मसूदा आणि त्यातील बारकावे समोर आले पाहिजेत असे खा. अमोल कोल्हे यांनी म्हटले.

मुंबईच्या साईभक्ताकडून साईचरणी १ कोटी १६ लाखांचा हिरेजडित हार अर्पण

● **शिर्डी । वीरभूमी** –

श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र घेऊन दररोज लाखो भाविक साई समाधीच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. अनेक भाविक आपल्या श्रद्धेनुसार बाबांच्या चरणी दान अर्पण करतात. याच भक्तिभावातून मुंबई येथील एका साईभक्ताने गुरुवारी रात्री श्री साईबाबांच्या चरणी एक किलो वजनाचा, सुबक नक्षीकाम केलेला



सोन्याचा हिरेजडित हार अर्पण केला. या हाराचे देणगी मूल्य १ कोटी १६ लाख ८५ हजार रुपये आहे. देश-विदेशातील लाखो भाविकांच्या मनात साईबाबांबद्दल अपार श्रद्धा आहे. या भक्तिभावातून भाविक विविध प्रकारच्या वस्तू आणि देणगी साईचरणी अर्पण करतात. यापूर्वी एक कोटी रुपये किमतीचा मुकुट अर्पण करणाऱ्या या भक्ताने आपले नाव जाहीर करू नये, अशी विनंती केली.

'मला मोठं व्हायचं नाही, माझं नाव गाजायला नको; फक्त माझी भक्ती बाबांपर्यंत पोहोचावी,' अशी भावना या साईभक्ताने व्यक्त केली. देणगी स्वीकारल्यानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी साईभक्ताचा सत्कार केला.

ऊसाला किमान ३४५० रुपये दर; नगर जिल्ह्यात ऊसदराची कोंडी फुटली!

पहिली उचल ३,२५० रुपये; मार्चमध्ये १०० आणि साखरेचा दर ५ हजारांवर राहिल्यास आणखी १०० रुपये मिळणार

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

साखरेचे वाढते दराचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा या उद्देशाने जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी ऊस दर जाहीर करावा, अशी मागणी करत शेतकरी संघटनांनी आंदोलन छेडले होते. या आंदोलनाची दखल घेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कारखानदारांची बैठक घेऊन ऊस दर जाहिर करण्याचे आदेश दिले होते. मात्र दोन बैठका निष्फळ झाल्यानंतर काल शुक्रवारी तिसरी बैठक यशस्वी झाली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा प्रशासन आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खा. राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ऊसदराचा तिढा सुटला. नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पहिली उचल ३ हजार २५० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय मार्च महिन्यात १०० रुपये आणि ऑक्टोबरमध्ये साखरेचा बाजारभाव पाच हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक राहिल्यास आणखी १०० रुपये देण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना किमान ३ हजार ४५० रुपये प्रतिटन दर मिळणार आहे.

ऑक्टोबर महिन्यापासून जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू झाला असला, तरी अनेक कारखान्यांनी अद्याप ऊसदर जाहीर केला नव्हता. सात कारखान्यांनी दर जाहीर केले होते; मात्र ते शेतकरी संघटनांना मान्य नव्हते. शेतकरी संघटनांनी पहिली उचल चार हजार रुपये देण्याची मागणी केली होती. यावरून नेवासा, राहुरी, शेवगाव यांसह जिल्ह्यातील विविध भागांत आंदोलने झाली. दरम्यान, ऊसदराचा प्रश्न सोडविण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुढाकार घेत आतापर्यंत दोन बैठका घेतल्या होत्या. शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली तिसरी बैठक झाली.



बैठकीच्या सुरुवातीला साखर कारखान्यांचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी संचालक यांच्याशी सुमारे तासभर चर्चा करण्यात आली. त्यानंतर शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावण्यात आले. मात्र, शेतकरी संघटनांनी किमान ३ हजार ७०० रुपये प्रतिटन दराची मागणी केली. साखर उतारा आणि उत्पादन खर्चाचा हिशेब कारखानदारांनी मांडल्यानंतर संघटनांनी किमान ३ हजार ५०० रुपये दरावर ठाम भूमिका घेतली. त्यामुळे पहिल्या चर्चेत तोडगा निघाला नाही.

त्यानंतर पालकमंत्र्यांनी कारखान्यांच्या अध्यक्षांशी स्वतंत्रपणे चर्चा केली. या चर्चेनंतर पुन्हा शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना बोलावण्यात आले. कारखानदार आणि शेतकरी प्रतिनिधींमध्ये झालेल्या चर्चेत सोलापूरचा फॉर्म्युला स्वीकारण्यावर एकमत झाले. त्यानुसार ऊसदराचा प्रश्न मार्गी लागला.

या बैठकीला कारखान्यांचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, आमदार मोनिका राजळे, आमदार विक्रम पाचपुते, माजी आमदार चंद्रशेखर घुले, भानुदास मुरकुटे, राजेंद्र नागवडे, सीताराम गायकर, काकासाहेब नरवडे आदी उपस्थित होते. शेतकरी संघटनांच्या वतीने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, अभिजित पोटे, रवींद्र मोरे, अनिल घनवट, दत्तात्रय फुंदे, संभाजी माळवदे, प्रताप चिंधे, अनिल इंगळे, अंकुश काळे, मच्छिंद्र आरले, महादेव आव्हाट, बाळासाहेब फटांगरे, जितेंद्र भोसले, संजय वाघ, प्रकाश देठे, सुरेश टाके आदी सहभागी झाले होते.

कारखानदार आणि शेतकरी संघटनांमध्ये सामंजस्याने मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांचा साखर उतारा अधिक असून, नगर जिल्ह्यात तो सरासरी ८.७ टक्के आहे. मात्र, सोलापूरच्या तुलनेत नगरचा उतारा अधिक असल्याने सोलापूरचा फॉर्म्युला स्वीकारण्यात आला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना किमान ३ हजार ४५० रुपये दर मिळणार आहे. उपपदार्थांपासून मिळणाऱ्या उत्पन्नानुसार कारखान्यांना यापेक्षा अधिक दर देणे शक्य आहे. त्यामुळे जो कारखाना अधिक दर देईल, त्या कारखान्याला शेतकऱ्यांनी ऊस द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

शेतकरी संघटनांनी नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोल्हापूर जिल्ह्याप्रमाणे ऊसदर मिळावा, अशी मागणी केली होती. अन्यथा शनिवार (दि. २८) पासून जिल्ह्यात रेलरोको आणि रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला होता. मात्र, बैठकीत किमान ३ हजार ४५० रुपये दर निश्चित झाल्यानंतर शेतकरी संघटनांनी समाधान व्यक्त केले. यापेक्षा कमी दर कोणताही कारखाना देणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने जिल्ह्यातील नियोजित आंदोलने स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा राजू शेट्टी यांनी शुक्रवारी केली.

वीरभूमी

SPOT NEWS

मानवसेवा प्रकल्पात ८१ मनोरुग्णांची मानसिक आरोग्य तपासणी

● अहिल्यानगर । वीरभूमी–

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या, रस्त्यावर निराधार व बेघर अवस्थेत जीवन जगणाऱ्या तसेच मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना आधार देण्याबरोबरच त्यांना योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत, त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेतली जावी आणि त्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या सामाजिक बांधिलकीतून जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथील जिल्हा मानसिक आरोग्य विभागाच्या वतीने श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ संचलित मानवसेवा प्रकल्प येथे मानसिक आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये मानवसेवा प्रकल्पातील एकूण ८१ लाभार्थ्यांची मानसिक आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर प्रत्येक लाभार्थ्याच्या मानसिक आरोग्यस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार जिल्हा रुग्णालयामार्फत औषधांचे वितरण करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली मानसोपचार तज्ज्ञ डॉ. तेजस्विनी मिस्किन, मनोविज्ञान तज्ज्ञ श्रीमती मीनल कटकोळ, सामाजिक कार्यकर्ते इंगोले गोरक्ष आणि मानसोपचार परिचारक अनिकेत केदारी यांनी या शिबिरात सक्रिय सहभाग घेतला. मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्तींना वेळेवर उपचार मिळणे, त्यांच्या आरोग्यातील बदलांचे नियमित निरीक्षण होणे आणि औषधोपचारांमध्ये खंड पडू नये, यासाठी अशा शिबिरांचे आयोजन केले जाते. जिल्हा मानसिक आरोग्य विभागाने मानवसेवा प्रकल्पात येऊन लाभार्थ्यांची तपासणी केल्यामुळे मनोरुग्णांना उपचार मिळण्यास मदत झाली. या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक दिलीप गुंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प समन्वयक कु. प्रसाद माळी, सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र दुधवडे, परिचारिका शोभा मेंगाळ, सामाजिक कार्यकर्त्या नीलम घुंगरे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब घुंगरे आणि जनसंपर्क अधिकारी सोमनाथ बर्डे यांनी विशेष सहकार्य केले.

हुतात्मा स्मारकात २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रध्दांजली

● अहिल्यानगर । वीरभूमी–

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात देशाच्या रक्षणासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि जवानांच्या स्मृतींना अहिल्यानगरमध्ये भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, लिओ क्लब, मराठी पत्रकार परिषद, गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील हुतात्मा स्मारक येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुष्पचक्र अर्पण करून तसेच मेणबत्त्या प्रज्वलित करून शहीद वीरांना आदरांजली वाहण्यात आली. उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिश हरवाणी, खजिनदार विजय कुलकर्णी, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, प्रकल्प प्रमुख सुनील छाजेड, धनंजय भंडारे, अरविंद पारगावकर, दिलीप कुलकर्णी, जालिंदर बोरुडे, रयत शिक्षण संस्थेच्या जिजामाता कन्या निवासच्या प्रमुख ज्योती मोकळ, बिट्टू मनोचा, प्रशांत मुनोत, कैलाश नवलानी, आशा पालवे, साहेबराव काते, दीपिका शेलार, राजेंद्र घोडके, लिओ क्लबचे अध्यक्ष हर्षवर्धन किथानी, गुरनूरसिंह वधवा आदींसह नागरिक उपस्थित होते.

महायुती सरकार ताजनापूर योजनेतून शेतकऱ्यांना न्याय देईल

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । २० कोटी ८८ लाखांचा निधी मंजूर केल्याबद्दल लाभधारक शेतकऱ्यांच्यावतीने सत्कार

● अहिल्यानगर । वीरभूमी –

महायुती सरकारच्या माध्यमातून ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण करण्यात येईल. दुष्काळी भागातील गावांना न्याय देण्याच्या उद्देशाने जलसंपदा विभाग या योजनेच्या कामाला प्राधान्य देईल, अशी ग्वाही जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

ताजनापूर उपसा सिंचन योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार करून आभार मानले. यावेळी आमदार मोनिका राजळे यांच्यासह लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक एकच्या पुनरुज्जीवनासाठी यांत्रिकी, विद्युत व स्थापत्य कामांकरिता २० कोटी ८८ लाख रुपयांच्या निधीला, तर तिसऱ्या टप्प्याच्या सर्वेक्षणासाठी ६३ लाख रुपयांच्या निधीला मंत्रालयात झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.



या महत्त्वपूर्ण निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली लाभक्षेत्रातील शेतकरी तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री विखे पाटील यांचा सत्कार केला.

या योजनेमुळे तालुक्यातील आठ गावांमधील सुमारे २ हजार ७४४ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तसेच योजनेच्या टप्पा क्रमांक एकच्या विस्तारित भागात १३ गावांचा समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सुरू केलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, असे मंत्री विखे पाटील यांनी शेतकरी व कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सांगितले.

ताजनापूर उपसा सिंचन योजनेचा तिसरा टप्पा शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यांसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. वर्षानुवर्षे दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या गावांतील शेतकऱ्यांच्या जीवनात या योजनेमुळे आमूलाग्र बदल घडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या ४६ गावांच्या पाणीप्रश्नावर नागपूर अधिवेशनादरम्यान विशेष बैठक घेण्यात येईल, असे आश्वासनही मंत्री विखे पाटील यांनी दिले.

शेवगाव येथे आयोजित टंचाई आढावा बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याच्या कामाबाबत शेतकऱ्यांना आश्वस्त केले होते. त्या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी प्रशासकीय स्तरावर प्राधान्याने कार्यवाही करण्यात आली. अवघ्या काही महिन्यांत योजनेच्या कामाला गती मिळाल्याने दिलेला शब्द पूर्ण होईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अभिनव पब्लिक स्कूलमध्ये पोक्सो कायदा व 'बालविवाह मुक्त भारत' अभियानातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



● अकोले । वीरभूमी–

बालपण सुरक्षित, शिक्षण समृद्ध आणि भविष्य सक्षम करण्यासाठी बालहक्क व संरक्षणविषयक कायद्यांची जाणीव प्रत्येक विद्यार्थ्याला असणे गरजेचे आहे. याच उद्देशाने मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल, अकोले येथे बालकांवरील अत्याचार प्रतिबंध, पोक्सो कायदा आणि बालविवाह निर्मूलन विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कायदेविषयक माहिती देत सुरक्षितता, सजगता आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या अल्फोन्सा मॅडम होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका वकील संघ, अकोलेचे सचिव अधिवक्ता डी. एम. काकड व सदस्य अधिवक्ता बी. आर. चौधरी, महेश सोनवणे,पर्यवेक्षक सानप पराग उपस्थित होते. इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

अधिवक्ता डी. एम. काकड यांनी बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो कायदा) २०१२ याविषयी सविस्तर माहिती दिली. बालकांचे हक्क, कायद्याने मिळणारे संरक्षण, वैयक्तिक सुरक्षितता आणि अनुचित घटनांबाबत त्वरित विश्वासू व्यक्ती किंवा संबंधित यंत्रणांना माहिती देण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

बालकांचे संरक्षण, त्यांचे हक्क अबाधित राखणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही केवळ शासनाची नव्हे, तर पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

ऊसदराची तडजोड ऊस उत्पादकांच्या हिताची नाही; जास्त दर देणाऱ्या कारखान्याला ऊस द्या!

अनिल घनवट यांचे आवाहन । पहिला हप्ता ३५०० रुपये देण्याची मागणी

● श्रीगोंदा । वीरभूमी–

जिल्ह्यातील साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनांच्या नेत्यांमध्ये झालेली ऊसदराची तडजोड ऊस उत्पादकांच्या हिताची नसल्याची भूमिका शेतकरी संघटनेचे नेते तथा स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी मांडली आहे. कारखानदारांनी जाहीर केलेला ३२५० रुपयांचा पहिला हप्ता अपुरा असून, ज्या कारखान्याकडून अधिक दर मिळेल, त्या कारखान्याला शेतकऱ्यांनी ऊस द्यावा, असे आवाहन त्यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे केले आहे.

ऊसदर निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत सुरुवातीला केवळ राजू शेट्टी आणि त्यांच्या निवडक कार्यकर्त्यांनाच प्रवेश देण्यात आल्याचा आक्षेप घनवट यांनी घेतला. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी दालनाबाहेर घोषणाबाजी केली. त्यानंतर घनवट आणि भूमिपुत्र शेतकरी



संघटनेच्या नेत्यांना बैठकीत प्रवेश देण्यात आला.

बैठकीच्या पहिल्या फेरीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी कारखानदारांच्या वतीने ३१०० रुपये पहिला हप्ता देण्याची तयारी दर्शवली. मात्र, हा प्रस्ताव मान्य नसल्याने पुन्हा चर्चा करण्यात आली. त्यानंतर ३२५० रुपये पहिला हप्ता, कारखाना बंद होताना १०० रुपये आणि डिसेंबर २०२७ मध्ये आणखी १०० रुपये देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र, पहिला हप्ता किमान ३५०० रुपये असावा, अशी मागणी घनवट यांनी केली. तसेच अंतिम हप्त्याची रक्कम साखर हंगाम संपताना देण्याची मागणीही त्यांनी केली.

साखरेला सध्या चांगला दर मिळत असून, शिखर सहकारी बँकेने साखरेचे मूल्यांकन ४५०० रुपये प्रतिक्विंटल केले आहे, तर प्रत्यक्ष बाजारात साखरेला ५२०० रुपयांपर्यंत दर मिळत असल्याचा दावा घनवट यांनी केला. त्यामुळे कारखान्यांना ३५०० ते ३७०० रुपये पहिला हप्ता देणे शक्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अहिल्यानगर आणि शेजारील पुणे जिल्ह्यातील काही कारखान्यांनी ३७०० रुपये दर जाहीर केल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

साखर व उपपदार्थांच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा योग्य वाटा ऊस उत्पादकांना मिळावा. रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार ७०:३० या प्रमाणात नफ्याचे वाटप व्हावे, अशी मागणीही त्यांनी केली. केवळ ३४५० रुपये अंतिम दर देऊन शेतकऱ्यांची बोळवण होण्याची शक्यता असून, अंतिम हप्ता मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलनाची तयारी ठेवावी, असे आवाहन घनवट यांनी केले आहे.

संतविचारांचा वारसा जपत जीवनाला योग्य दिशा द्या

महंत रामगिरी महाराज यांचे आवाहन । पाथर्डीतील साईनाथनगरमध्ये येळेश्वर संस्थानच्या दिंडीचे उत्साहात स्वागत

● पाथर्डी । वीरभूमी–

प्रत्येक संसारी व्यक्तीला आत्मकल्याण साधायचे असेल, तर गुरू आणि संतसंगतीची आवश्यकता असते. संतांचा सहवास जीवनाला योग्य दिशा देणारा आणि माणसाच्या जीवनाचे सार्थक करणारा असतो. संतांनी दिलेले विचार व संस्कारांचा वारसा जपत त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याचा प्रयत्न प्रत्येक भक्ताने करावा. श्रद्धा, नम्रता आणि भक्तिभावाने संतांना शरण गेल्यास जीवनाचे अंतिम कल्याण साधता येते. वारी हा वारकऱ्यांचा आत्मा असून संतांच्या सहवासात राहून भक्तांनी आपल्या जीवनाचा उद्धार करून घ्यावा, असे आवाहन येळेश्वर संस्थानचे महंत गुरुवर्य रामगिरी महाराज यांनी केले.

तालुक्यातील येळी येथील श्री येळेश्वर संस्थानची आळंदी पायी दिंडी बुधवारी पाथर्डी शहरातील साईनाथनगर येथे दाखल झाली. यावेळी परिमल बाबर परिवारासह साईनाथनगरमधील नागरिक आणि भाविकांनी दिंडीचे उत्साहात स्वागत केले. यानिमित्त आयोजित प्रवचनसेवेत महंत रामगिरी महाराज वारकऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

दिंडीच्या आगमनानिमित्त बाबर परिवाराच्या वतीने भक्तिभावाने संतपूजन, पालखीपूजन आणि विणापूजन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने पूजन करून दिंडीचे स्वागत करण्यात आले. स्वागत सोहळ्याला आकर्षक आणि मंगलमय स्वरूप देण्यासाठी पाथर्डीतील प्रसिद्ध रांगोळी कलाकार अभिजित भागवत सर यांनी मनोहारी रांगोळ्यांचे रेखाटन केले होते. या कलात्मक रांगोळ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. संतविचार, भक्तिभाव आणि वारकरी परंपरेच्या संगमातून साकारलेला हा सोहळा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.

प्रवचनात महंत रामगिरी महाराज म्हणाले की, पाथर्डी ही संत-महात्म्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. संत भगवानबाबा, संत वामनभाऊ महाराज, संत कुशाबा तनपुरे महाराज, संत आनंदऋषीजी महाराज, संत खंडोजीबाबा आणि संत नारायण महाराज अशा थोर संतांच्या वास्तव्याने व पदस्पर्शाने या भूमीला आध्यात्मिक वैभव प्राप्त झाले आहे. येथील भाविकांनी वारकरी संप्रदायाचा समृद्ध वारसा जपला असून संतविचारांचा प्रसार करण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे.

संतांच्या सहवासातून माणसाला जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते. संतांचे विचार आत्मसात केल्याने मनामध्ये भक्तिभाव, नम्रता आणि सदाचाराची भावना निर्माण होते. त्यामुळे प्रत्येकाने संतविचारांचे आचरण करावे. आळंदीच्या वारीत सहभागी होऊन भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा आनंद अनुभवावा, असे आवाहनही त्यांनी केले.



या भक्तिमय सोहळ्याला परिमल बाबर, अशोक साठे, अभिजित भागवत, संदीप वाघ, विजय पडधरीया, वैभव खुटाळे, ज्ञानेश्वर दिवटे, गणेश रोकडे, शंकर उदबत्ते, अजिंक्य भागवत, श्रावण भंडारी, नामदेव साठे, शरद साठे, महेश दौंड, रमेश भंडारी, शहाणे सर, अक्षज बाबर यांच्यासह साईसेवा महिला मंडळाच्या सदस्या, भजनी मंडळाचे सदस्य, वारकरी आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. परिमल बाबर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे राज्यव्यापी एकदिवसीय कामबंद आंदोलन

● अहिल्यानगर । वीरभूमी –

राज्यातील विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. विविध मागण्यांवर शासनाकडून वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाच्या या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संयुक्त कृती समितीने आता आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होणार आहेत. त्यानंतरही शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला असल्याची माहिती सचिव संतोष कानडे यांनी दिली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर अनुज्ञेय असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तातडीने लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सन २००५ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू अथवा पूर्ण झालेल्या आणि त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या अनुदानित कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या आंदोलनात जिल्हा सचिव संतोष कानडे, रविंद्र वर्पे, सिताराम मुळे, शरद खरात, जगन्नाथ सावळे, राजू पाटील, मनोज पवार, बाबु शिंदे, दिपक वराट, जगदीश कोंगे, विजय म्हस्के, दत्तात्रय भडकवाड, महादेव चेमटे, दादासाहेब भिडे, बाबासाहेब वाघुले, योगेश शेळके, सविता डांगे, जया साळवे, सचिन लांघी, भानुदास गुंजाळ, दत्तात्रय हिरणवाळे, जनार्दन बर्डे, गणेश गोरे, अजय ठोंबरे, अतुल हापसे, काशिनाथ मते, प्रशांत घोडके, कलीम पठाण, सुरेश शिंगणे न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज मधील शिक्षकेतर कर्मचारी कामबंद आंदोलनात सहभागी झाले आहेत.

कृष्णप्रित वेलफेअरकडून यशवंत विद्यालयाला सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीनची भेट

● अहिल्यानगर । वीरभूमी –

मुकुंदनगर (फकीरवाडा) येथील यशवंत माध्यमिक विद्यालयात कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने मासिक पाळी स्वच्छता व किशोरवयीन आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. होगनस इंडिया प्रा. लि. यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमात किशोरवयीन मुलींना मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि योग्य सवयी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यालयाला सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन प्रदान करण्यात आली. तसेच विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास होगनस कंपनीच्या एचआर नम्रता गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती. तसेच संचालिका डॉ. प्रांजल गाडे-लामखडे, संस्थापक अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, संचालिका प्रियंका पाटील शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनकर मॅडम, अमर बोबडे व श्रेयस दुसिंग उपस्थित होते. कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

दुष्काळग्रस्त भागात गाव निहाय पाणी,चाऱ्याचे नियोजन करा

पालक सचिव प्रवीण दराडे । संगमनेर तालुक्यातील दुष्काळी गावांची केली प्रत्यक्ष पाहणी

● शिर्डी । वीरभूमी–

संगमनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालक सचिव तथा सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी दुष्काळग्रस्त गावांना भेटी दिल्या. पाणीटंचाईची सद्यस्थिती जाणून घेतली. शेतकरी,ग्रामस्थ यांच्याशी संवाद साधून अडचणी समजून घेतल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे, संगमनेरचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रदीप खंडेराव. तालुका कृषी अधिकारी श्रीमती बोडके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याचे पालक सचिव प्रवीण दराडे यांनी चिंचेवाडी, जांभूळवाडी, खंडेरायवाडी आणि संगमनेर परिसरातील जलसंधारण, चारा-पाणी नियोजन, संभाव्य चारा छावणी जागा तसेच पिकांच्या नुकसान संबंधित विविध बाबींची पाहणी केली.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त जलसंधारणाच्या कामे हाती घेऊन प्रशासनाने भविष्यातील येणाऱ्या अडचणी संदर्भातले नियोजन करावे. तसेच ज्या गावांमध्ये दुष्काळाची तीव्रता जास्त आहे त्या गावातील गावाचे पाणी, पिण्याच्या पाण्याचे नियोजन तसेच गावात असणारे पशुधन आणि त्यासाठी लागणारा आवश्यक चारा आणि पाणी, गरज भासल्यास चारा छावण्या बाबतची जागा निवड व इतर अनुषंगिक बाबीचे नियोजन करण्याचे निर्देश विविध विभागांना दिले.

चिंचेवाडी येथे शासनाच्या पाझर तलावाची पाहणी करून जांभूळवाडी येथील शेतकरी ज्ञानदेव सुभाष शिंदे यांच्या जनावरांचा गोठा येथे भेट दिली. येथे उपलब्ध चारा साठा आणि पीक पाहणी केली. तसेच शासनाच्या गट क्रमांक ८६८ आणि ८७४ येथील छावणी करिता प्रस्तावित जागेची पाहणी केली.

खंडेरायवाडी गावठाण येथे टँकर रिकामे करण्याच्या साठवणुकीच्या जागेची (पाण्याची टाकी) पाहणी करून शेतकरी पांडुरंग बाळकृष्ण तळेकर यांच्या शेततळ्याची आणि रब्बी हंगामातील जळून गेलेल्या पिकांची पाहणी पालक सचिव दराडे यांनी केली. शेतकरी अण्णासाहेब भाऊसाहेब ढेरंगे यांच्या शेतातील पाण्याअभावी खराब झालेल्या कांदा पिकाची पाहणी केली.

पाहणी दरम्यान पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था आणि नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

पालक सचिव दराडे यांनी गावभेटीदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधला. पिण्याच्या पाण्याची टंचाई, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, पिकांचे नुकसान, जनावरांच्या चाऱ्याची समस्या तसेच दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत त्यांनी ग्रामस्थांकडून माहिती जाणून घेतली.

या पाहणी दौऱ्यातून प्राप्त झालेली माहिती आणि दुष्काळग्रस्त भागातील वस्तुस्थितीचा अहवाल वरिष्ठ स्तरावर मांडण्यात येणार असून, त्यानुसार आवश्यक उपाययोजनांबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

पालखेड डाव्या कालव्याच्या रब्बी आवर्तनातून लाभधारक शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने पाणी द्या : आ. विवेक कोल्हे

● कोपरगाव । वीरभूमी–



तालुक्यातील पालखेड डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पुरेशा दाबाने व संस्थांच्या मंजूर कोट्याप्रमाणे पाणी मिळावे, यासह तातडीने पालखेड विभागाची कालवा सल्लागार समितीची मीटिंग घेण्यात यावी अशी मागणी करत आमदार विवेक कोल्हे यांनी जलसंपदा विभागाकडे केली आहे.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी पालखेड डाव्या कालव्यामध्ये कमी दाबाने पाणी सोडण्यात आले आहे. मात्र, या आवर्तनासंदर्भात कालवा सल्लागार समितीची कोणतीही बैठक झालेली नसल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि नाराजी आहे. पालखेड चारी क्रमांक ३६ ते ५२ अंतर्गत येणाऱ्या ओगदी येथील जय हनुमान पाणी वापर संस्था (३ आर), करंजी येथील कुंभार गुरुजी पाणी वापर संस्था (५ आर), पढेगाव येथील संत तुकाराम पाणी वापर संस्था (४५ मेन), कासली येथील नारायणगिरी पाणी वापर संस्था (५ एल), सावळगाव येथील यशवंती जलवाटप संस्था (४ एल), तिळवणी ५१ चारी आणि उक्कडगाव ५२ चारी या भागातील शेतकऱ्यांना पाण्याची आवश्यकता आहे.

सध्या रब्बी हंगामातील पिकांना पाण्याची नितांत गरज असून कालव्यातून कमी दाबाने पाणी सोडल्यास शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचणे कठीण होणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व पाणी वापर संस्थांच्या मंजूर कोट्यानुसार पूर्ण दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे. ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजना आणि पाझर तलावांसाठी पाणी आरक्षण नसल्यामुळे हे जलसाठे भरण्याची शक्यता कमी असली, तरी किमान शेतीसाठी आवश्यक पाणी मिळावे, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

या पार्श्वभूमीवर पालखेड डावा कालव्याच्या कार्यकारी अभियंत्यांसोबत तातडीने बैठक आयोजित करून या सर्व पाणी वापर संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी व प्रतिनिधींना बैठकीस निमंत्रित करावे. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन रब्बी आवर्तनाचे योग्य नियोजन करावे आणि सर्व लाभधारकांना न्याय द्यावा, अशा स्पष्ट सूचना आमदार विवेक कोल्हे यांनी संबंधित विभागाला दिल्या आहेत.

नेत्रदान चळवळ आणि सामाजिक सेवेतील योगदानाची दखल; डॉ. प्रेमकुमार भट्टड यांना 'समाजरत्न' पुरस्कार



● श्रीगोंदा । वीरभूमी –

नेत्रदान चळवळ, गरजू रुग्णांना मदत आणि ग्रामीण भागात नेत्रआरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणारे दौंड येथील प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांना जिल्हास्तरीय 'समाजरत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

सम्यक तथागत सोशल अँण्ड कल्चरल फाउंडेशनच्या वतीने संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सचिन खरात, दौंडच्या नगराध्यक्षा दुर्गादेवी जगदाळे, उपनगराध्यक्षा छायाताई थोरात, अनिता पठारे आदींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. भट्टड यांनी नेत्रदान चळवळीत मोलाचे योगदान दिले असून, अनेक गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी गावोगावी नेत्रतपासणी शिबिरे व मार्गदर्शनपर उपक्रम राबविले आहेत. मरणोत्तर नेत्रदानाचे महत्त्व पटवून देत अनेक दृष्टिहीन रुग्णांच्या जीवनात नेत्रदानाच्या माध्यमातून नवदृष्टी निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. पंढरपूरच्या आषाढी वारीतील वारकऱ्यांची नेत्रतपासणी करून ते आरोग्यसेवेचे व्रतही जोपासत आहेत.

या सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी डॉ. मीना भट्टड, मुलगा डॉ. चिराग भट्टड (नेत्रतज्ज्ञ) आणि मुलगी डॉ. चैत्राली भट्टड (एम.डी. पॅथॉलॉजिस्ट) यांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे.

संविधान दिनी श्रीगोंदा न्यायालयात माणुसकीचा जागर!

न्यायाधीशांसह वकील, पक्षकारांचे रक्तदान । ६७ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग



● श्रीगोंदा । वीरभूमी–

भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून श्रीगोंदा जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी आणि पक्षकारांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान केले. या शिबिरात एकूण ६७ जणांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला.

जिल्हा न्यायालय श्रीगोंदा, श्रीगोंदा वकील संघ आणि तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (२६ नोव्हेंबर) या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे, जिल्हा न्यायाधीश एस. एच. साळुंखे, वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश ए. एम. मुजावर, यू. वाय. बोराडे-कपूर, कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश पी. व्ही. पाटील, आर. बी. खवले तसेच वकील संघाचे अध्यक्ष ड. जयंत शिंदे यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले.

या शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश ए. एम. मुजावर, यू. वाय. बोराडे-कपूर आणि कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश पी. व्ही. पाटील यांनी स्वतः रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. न्यायाधीशांनी स्वतः पुढाकार घेतल्याने उपस्थित वकील आणि नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

वकील संघाचे अध्यक्ष अॅड. जयंत शिंदे यांच्यासह वकील संघाचे पदाधिकारी, ज्येष्ठ व युवा वकील, सरकारी वकील आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे न्यायालयीन कामासाठी आलेल्या पक्षकारांनीही स्वयंस्फूर्तीने रक्तदानात सहभाग नोंदविला. त्यामुळे न्यायालयीन परिसरात संविधानातील समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांचे कृतीतून दर्शन घडले.

सध्या रक्ताचा तुटवडा लक्षात घेता या शिबिरातून संकलित झालेल्या ६७ रक्तपिशव्यांमुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. एका रक्तदानातून तीन रुग्णांना मदत होऊ शकते, या दृष्टीने सुमारे २०१ रुग्णांना लाभ होण्याची शक्यता आयोजकांनी व्यक्त केली. शिबिराच्या यशस्वितेसाठी न्यायालय प्रशासन, श्रीगोंदा वकील संघ, तालुका विधी सेवा समिती आणि साईसेवा रक्तपेढीच्या वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले.

हंगा गावात संविधान दिनी माणुसकीचा जागर; पशू-पक्ष्यांची तहान भागविण्यासाठी गौरव शिंदे यांचा स्तुत्य उपक्रम!

● पारनेर । वीरभूमी –



भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून हंगा गावात सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा अनोखा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला. जनसेवक इंजि. गौरवभाऊ शिंदे यांनी पशू-पक्ष्यांची तहान भागविण्याच्या उद्देशाने गावातील पाणवठ्यांमध्ये पाणी सोडण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला. त्यांच्या या संवेदनशील आणि सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.२६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, बंधुता, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांची शिकवण दिली आहे. याच मूल्यांचा सामाजिक जीवनात अंगीकार करत गौरवभाऊ शिंदे यांनी संविधान दिनाच्या निमित्ताने मुक्या जीवांप्रती आपली संवेदनशीलता व्यक्त केली. माणसांप्रमाणेच पशू-पक्ष्यांनाही जगण्याचा आणि पाण्यासारख्या मूलभूत गरजेचा अधिकार आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश त्यांच्या उपक्रमातून देण्यात आला. सध्याच्या बदलत्या वातावरणात आणि वाढत्या तापमानामुळे अनेक पशू-पक्ष्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. विशेषतः ग्रामीण भागात पाण्याची उपलब्धता कमी झाल्यास मुक्या जीवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत पाणवठ्यांमध्ये पाणी उपलब्ध करून देणे ही केवळ मदत नसून निसर्गाप्रती असलेली आपली जबाबदारी आहे. याच भावनेतून गौरवभाऊंनी हा उपक्रम राबवून सामाजिक जाणीवेचा आदर्श निर्माण केला.

समाजसेवा म्हणजे केवळ मोठमोठे उपक्रम राबविणे नव्हे, तर आपल्या आजूबाजूच्या सजीवांच्या वेदना आणि गरजा ओळखून त्यांच्यासाठी कृती करणे होय. गौरवभाऊ शिंदे यांच्या या छोट्याशा पण मोलाच्या कृतीतून हाच विचार अधोरेखित झाला आहे.

संविधान दिनी माणुसकी, जीवदया आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांच्या या कार्यामुळे गावातील नागरिकांमध्येही पशू-पक्ष्यांप्रती प्रेम, दया आणि संवेदनशीलतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

वीरभूमी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातून गावांचा सर्वांगीण विकास

सभापती राम शिंदे । अहिल्यानगरमध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची नाशिक विभागीय कार्यशाळा व पुरस्कार वितरण सोहळा

● अहिल्यानगर । वीरभूमी–

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे केवळ पुरस्कार मिळविण्यापुरते मर्यादित नसून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे पारदर्शक आणि परिणामाभिमुख अभियान आहे. ग्रामपंचायतींच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग वाढविण्यासह गावांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी या अभियानातून दिशा मिळत आहे. ग्रामस्थांनी एकत्रितपणे गावाच्या विकासाचे नियोजन केल्यास उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर होऊन विकासकामांना गती मिळेल, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५-२६' अंतर्गत 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावांचा संकल्प' या विषयावर नाशिक विभागस्तरीय कार्यशाळा, पुरस्कार वितरण सोहळा आणि सरपंच परिसंवादाचे आयोजन शुक्रवारी (दि. २७) अहिल्यानगर येथील द्वारका लॉन, नेप्ती चौक, नगर-कल्याण रोड येथे करण्यात आले होते. यावेळी सभापती राम शिंदे बोलत होते.

शिंदे म्हणाले की, गावांच्या विकासासाठी पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि पर्यावरण संवर्धन या विषयांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना ग्रामस्थांनीही सक्रिय सहभाग घ्यावा. पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचे काम इतर गावांसाठी प्रेरणादायी असून त्यांनी केलेल्या नावीन्यपूर्ण कामांचा आदर्श इतर ग्रामपंचायतींनी घ्यावा. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिकाधिक ग्रामपंचायतींनी सहभागी होऊन गावांना विकासाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी प्रयत्न करावेत.



यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार सुनील कर्जतकर, आ. काशिनाथ दाते, आ. मोनिका राजळे, आ. विठ्ठलराव लंघे, आ. विक्रम पाचपुते, आ. अमोल खताळ, आ. अक्षय कर्डिले, ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविण्याचे उद्दिष्ट आहे. शहरांप्रमाणेच गावांचाही विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वयाने आणि एकजुटीने काम करावे. विविध शासकीय योजनांचा लाभ गावातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

या अभियानात राज्यातील ५ हजार ६४४ गावांनी सहभाग घेतला असून विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात विकासकामे करण्यात आली आहेत. ४ हजार १८ ग्रामपंचायतींच्या वेबसाइट तयार करण्यात आल्या असून ४ हजार ४७ गावांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. तसेच ५ हजार १५८ ग्रामपंचायतींनी विविध सोयीसुविधा निर्माण केल्या आहेत. गावांमध्ये व्यायामशाळा, मुलींसाठी शाळांमध्ये स्वतंत्र शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून ३ लाख ६० हजार घरे पूर्ण झाली आहेत. अनेक विकासकामे लोकवर्गणीतून झाली असून अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक ग्रामपंचायतीने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे अभियानाला बळ मिळाल्याचे सांगितले. विविध शासकीय योजनांची सांगड घालून गावांचा सर्वांगीण विकास साधणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यात शंभर टक्के ग्रामपंचायतींचा सहभाग अपेक्षित आहे. वनराई बंधारे उभारणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी विश्वनाथ कोरडे यांनी जलतारा या जलसंधारणाच्या कामासाठी वैयक्तिकरित्या ५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यांच्या या योगदानाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यशाळेत 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावांचा संकल्प' या विषयावर सरपंच परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यामध्ये जलसंधारण, पाण्याचे नियोजन, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, लोकसहभाग आणि ग्रामविकासाच्या विविध उपाययोजनांवर विचारमंथन झाले. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी अभियानाची संकल्पना आणि नाशिक विभागातील कामांचे सादरीकरण केले. ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास नाशिक विभागातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा व तालुकास्तरीय विभागप्रमुख, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले, तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी आभार मानले.

पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा गौरव

■ मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत नाशिक विभागस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये ग्रामपंचायत दुगांव (ता. जि. नाशिक) हिने प्रथम क्रमांक पटकावत १ कोटी रुपयांचे पारितोषिक मिळविले. ग्रामपंचायत रेनवडी (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) हिने द्वितीय क्रमांक व ८० लाख रुपये, तर ग्रामपंचायत लोणी बु. (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) हिने तृतीय क्रमांक व ६० लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले.

■ अहिल्यानगर जिल्हास्तरावर ग्रामपंचायत कासार पिंपळगाव (ता. पाथर्डी) ने प्रथम क्रमांक व ५० लाख रुपये, ग्रामपंचायत सौंदाळा (ता. नेवासा) ने द्वितीय क्रमांक व ३० लाख रुपये, तर ग्रामपंचायत हिवरे बाजार (ता. अहिल्यानगर) ने तृतीय क्रमांक व २० लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला.

कुकडीचे पाणी अन्यत्र वळविण्याचा डाव : घनश्याम शेलार

पंप स्टोरेज प्रकल्पांविरोधात सात तालुक्यांत जनआंदोलन उभारण्याचा इशारा

● श्रीगोंदा । वीरभूमी–

भीमाशंकर व नाणेघाट परिसरात उभारण्यात येणाऱ्या पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पांमुळे कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेती सिंचनाचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असल्याचा आरोप डिंभे-माणिकडोह बोगदा निर्माण कृती समितीचे अध्यक्ष घन:श्याम शेलार यांनी केला आहे. या प्रकल्पांसाठी डिंभे व माणिकडोह धरणांतील पाणी वळविण्याचा सरकार आणि खासगी कंपन्यांचा छुपा अजेंडा असल्याचा दावाही त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न झाल्यास करमाळ्यापासून आंबेगाव-जुन्नरपर्यंत तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा त्यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

कुकडी प्रकल्पाच्या माध्यमातून पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांतील आंबेगाव, जुन्नर, शिरूर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत आणि करमाळा या सात तालुक्यांमधील जवळपास दीड लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. मात्र, या क्षेत्राला पुरेसे पाणी मिळविण्यासाठी दरवर्षी शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागतो. सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असतानाच सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर तब्बल ५९ पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे शेलार यांनी म्हटले आहे.



भीमाशंकर आणि नाणेघाट परिसरात डिंभे व माणिकडोह धरणांच्या जवळ अदानी आणि मेहता समूहाच्या कंपन्यांमार्फत हालचाली वेगाने सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने यापूर्वीच आंदोलन उभे राहिले आहे. संबंधित प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असून, भविष्यात कुकडी प्रकल्पाच्या पाण्याचे फेरवाटप करून डिंभे व माणिकडोह धरणांतील पाणी या प्रकल्पांसाठी वळविण्याचा सरकार आणि खासगी कंपन्यांचा छुपा अजेंडा असल्याचा गंभीर आरोप शेलार यांनी केला आहे.

असे पाणी वळविण्यात आले, तर तीन जिल्ह्यांतील सात तालुक्यांमधील शेती व्यवस्था उद्ध्वस्त होऊन शेतकऱ्यांवर कायमस्वरूपी दुष्काळाचे संकट ओढवू शकते, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. या निर्णयाचे परिणाम केवळ शेतीपुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातील बाजारपेठा, व्यापार आणि एकूण अर्थव्यवस्थेवर होतील, असे शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

या प्रश्नाचे गांभीर्य वेळीच लक्षात घेऊन केवळ आंबेगाव-जुन्नरपुरते आंदोलन मर्यादित न ठेवता करमाळ्यापासून आंबेगाव-जुन्नरपर्यंतच्या सर्व सात तालुक्यांतील शेतकरी आणि नागरिकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे. यासाठी प्रत्येक तालुक्यात जाऊन जनजागृती करण्यात येणार असून, शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी व्यापक संघर्ष उभारला जाईल, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विखे पाटील हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्यसेवा

● अहिल्यानगर । वीरभूमी–

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णालयातील विविध वैद्यकीय तपासण्या, उपचार आणि शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाला उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



या उपक्रमांतर्गत गर्भवती महिलांसाठी सोनोग्राफी, नॉर्मली स्कॅन आणि आवश्यक रक्त तपासण्या मोफत करण्यात येत आहेत. तसेच सामान्य प्रसूती, सिझेरियन प्रसूती आणि कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियांचाही विनामूल्य लाभ दिला जात आहे. माता आणि बालकांचे आरोग्य सुरक्षित राहावे, तसेच महिलांना आर्थिक भाराविना आवश्यक वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत.

याशिवाय एक्स-रे, सोनोग्राफी, ईसीजी, २डी इको आणि अँजिओग्राफी यांसारख्या महत्त्वपूर्ण वैद्यकीय तपासण्यांचाही या उपक्रमात समावेश आहे. नेत्ररुग्णांसाठी मोतीबिंदूसह डोळ्यांच्या अन्य आवश्यक शस्त्रक्रिया मोफत करण्यात येत आहेत. तसेच वीस वर्षांखालील मधुमेहग्रस्त रुग्णांना इन्सुलिनची सुविधा आणि लहान मुलांसाठी आंतररुग्ण उपचारसेवाही विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळत आहे.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यासह परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. विविध सुपरस्पेशालिटी विभागांच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांची सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील पहिले अवयव प्रत्यारोपण केंद्र सुरू करून प्रत्यारोपणासारख्या गुंतागुंतीच्या उपचारांची सुविधाही जिल्ह्यात निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे अशा उपचारांसाठी रुग्णांना अन्य मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज कमी होत आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांच्या माध्यमातून पात्र रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ दिला जात असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ही सुविधा मोठा आधार ठरत आहे.

पालकांनी आपली स्वप्ने बालकांवर न लादता त्यांना बालपण जगू द्यावे : डॉ. ललित गुगळे

● पाथर्डी । वीरभूमी–

प्राथमिक शाळांमधून आम्ही बालपण जगलो. पालकांनी आमच्या बाल्य जीवनात हस्तक्षेप केला नाही. समूह जीवनाची खरी जाणीव प्राथमिक शाळेत झाल्याने खऱ्या अर्थाने जीवन शिक्षण तेथे मिळाले. सध्या मात्र पालकांनी बालकांचे बालपण हिरावून पूर्णपणे अनोळखी असलेल्या महत्त्वकांशी व स्वप्नाळू दुनियेमध्ये बालकाला लोटल्याने लहान पण, देगा देवा असे म्हणण्याची बालकांवर वेळ आली आहे. आपली स्वप्ने बालकांवर लादण्याऐवजी त्यांच्या मनात आत्मविश्वास व संस्कार जागवण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ बालरोगतज्ञ तथा विचारवंत डॉ. ललित गुगळे यांनी व्यक्त केले.

सुमारे १६७ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या त्याकाळचे जीवन शिक्षण मंदिर व आजची पीएम श्री जिल्हा परिषद मराठी शाळा (मुले) या शाळेच्या माजी विद्यार्थी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, केंद्रप्रमुख सविता कुटे, नगरसेवक नंदकुमार शेळके व अमोल गर्जे, मुख्याध्यापक नंदा तुपे व राजू गोल्हार, प्राचार्य अजय भंडारी, शाळा व्यवस्थापन समितीच्या जयश्री काळोखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अविनाश मंत्री, उपाध्यक्ष रमेश मोरगावकर, सचिव अनिल खाटेर आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी व माजी प्राचार्य भगीरथ उरणकर होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण वर्तुळात प्रथमच माजी विद्यार्थ्यांचा मेळावा भव्य प्रमाणात यशस्वीरित्या संपन्न झाला. स्थानिक सर्वच वयोगटातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत जुन्या आठवणींना उजाळा दिला. पूर्वी शेणा मातीने सारवलेली, पन्हाळी पत्रे असलेली शाळा व आता सर्व भौगोलिक सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, भव्य क्रीडांगण, डिजिटल क्लासरूम, अंतरिक्ष खगोलीय प्रयोगशाळा, असे बदललेले रूपड.. माजी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी विविध रंगी आकर्षक रांगोळ्या, शैक्षणिक संदेश देणारी घोषवाक्य, फुलांची सजावट, पुष्पवृष्टी करत माजी विद्यार्थ्यांचे झालेले स्वागत, यामुळे वातावरण एकदम चैतन्यदायी व भारावून गेले.

उद्योजक रवींद्र पाथरकर, जय भवानी मंडळाचे राजेंद्र कोटकर, शायर हुमायून आतार, उद्योजक सागर दराडे, सामाजिक कार्यकर्ते चंदन कुचेरिया, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते नंदकुमार डाळिंबकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. ज्ञानेश्वर दराडे, डॉ. लालजी जोशी, उद्योजक संतोष एडके, संदीप लोखंडे, सूर्यकांत काळोखे, रवींद्र दानापुरे, मंजू फुटाणे, उद्योजक शरद पाथरकर, अनिल तरवडे, सुखदेव मर्दाने, संतोष मेघुंडे, स्वप्निल गुगळे आदींनी चर्चेत भाग घेतला. मेळाव्यासाठी सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी बोलताना डॉ. गुगळे



म्हणाले, प्राथमिक शिक्षण व्यवस्थेमध्ये ग्रामीण भागात काळानुरूप बदल आवश्यक आहेत. शिक्षणातून पिढीचे भवितव्य निर्माण होत असल्याने शाळेच्या सर्वांगीण विकास कार्यात ग्रामस्थ, पालक, स्वयंसेवी व सामाजिक संस्थांचे योगदान आवश्यक आहे. शाळा गावाची आहे. गावातच राहणार आहे. गावाचे वैभव व भावनिक श्रद्धास्थान म्हणून शाळेचा विकास व्हावा. आपण शाळेमधून शिक्षण घेऊनबाहेर पडतो, पण प्राथमिक शाळा मात्र मनातून जात नाही. दीडशे वर्षांहून अधिक वर्षाचा इतिहास घडवणारी पाथर्डी ची शाळा पाथर्डी करांचे श्रद्धास्थान आहे. स्व. भरते बाई, स्व. गोरे गुरुजी ,ढोले गुरुजी, डांगे गुरुजी, मरकड मॅडम, शिरसाट मॅडम, मुस्ताक शेख, बडे गुरुजी अशा विविध शिक्षकांनी येथे आदर्श पिढ्या घडवून इतिहास रचला.

हैदराबादचे पोलीस आयुक्त महेश भागवत याच शाळेचे विद्यार्थी आहेत. याचा प्रत्येकाला अभिमान वाटतो अशा शब्दात प्रमुख वक्त्यांनी भाषणातून उल्लेख केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष अविनाश मंत्री, सूत्रसंचालन अरिफ बेग व परिमल बाबर तर आभार संघाचे सचिव अनिल खाटेर यांनी मानले मुख्याध्यापक नंदा तुपे यांनी स्वागत करत शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षिका छाया चंदनशिव, सुरेखा बडे, भावना देवरे, मंदा पालवे, मनिषा फटांगरे, कविता शिरसाट ज्योती भोसले, सुर्यकांत काळोखे आदींनी परिश्रम घेतले